खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ

हुतात्मा राजगुरु महाविदयालय

राजगुरुनगर,ता खेड.जि पुणे.

विदयार्थी कल्याण मंडळ

<u>निर्भय कन्या अभियान</u>

## वार्षिक अहवाल २०१६–१७

सन २०१६–१७ या शैक्षणिक वर्षामध्ये हुतात्मा राजगुरु महाविदयालयामध्ये विदयार्थी कल्याण मंडळाअंतर्गत निर्भय कन्या अभियान ही कार्यशाळा दि:११/१२/२०१७ रोजी राबविण्यात आली होती. सावित्रीबाई फुले पुणे विदयापीठाच्या मान्यतेनुसार या कार्यशाळेची कार्यवाही करण्यात आली. आर्थिकदृष्टया दुर्बल व अनुसुचित जाती,जमातीतील विदयार्थ्यांना अतिरिक्त व विशेष या कार्यशाळेचा लाभ व्हावा या करिता या कार्यशाळेची कार्यवाही करण्यात आली सदर कार्यशाळेत १३४ विदयार्थीनीनी सहभाग घेतला होता.

बहुतांश मुली ग्रामीण भागातील असून दररोज बसने महाविदयालयात ये–जा करतात. या मुली आपल्या उच्च शिक्षणाच्या प्रमुख घटक आणि केंदबिंदू आहेत. तसेच महिलांवर होणारे अत्याचार छेडछाडीचे प्रकारण ,दुषित सामाजिक पर्यावरणाचा प्रतिकुल परिणाम स्त्री–शिक्षणावर होतो.मुली भयाच्या वातावरणात वाढतात.त्यामुळे अभ्यासेत्तर उपक्रमांत मुली मोकळेपणाने सहभागी होत नाहीत. मुलींचीच शिक्षणाबरोबर आपण सबळ आहोत.मानसिक दृष्टया स्वावलंबी आहेत.स्वत:चे संरक्षण केले पाहिजे. अशा प्रकारे आपल्या सामर्थ्याची ओळख पटवून घेतली पाहिजे.असे स्वत:ला शिकवले तरच निर्भय,निरामय,आणि स्वच्छ वातावरणात शिक्षणाने मिळणारे स्वातंत्र्य त्या उपभोगू शकतील.

१.स्वसंरक्षणाच प्रशिक्षण देणे.

२.अन्याय,अत्याचार मुकाबला करण्याचे सामर्थ्य प्रदान करणे.

३.विदयार्थिनीमध्ये धैर्य व हिंमत वाढविण्यासाठी प्रयत्न करणे.

४.भयमुक्त वातावरणात मोकळेपणाने शैक्षणिक उपक्रमात भाग घेण्याचे धाडस त्यांच्यामध्ये निर्माण करण्यासाठी साहाय्य करणे.

५.विदयार्थीनीना मानसिकदृष्टया स्वावलंबी होण्यास मदत करणे.

६.शिक्षणेत्तर उपक्रमांमध्ये विदयार्थीनींचा सहभाग वाढविणे.

तसेच सदर कार्यशाळेमध्ये सकाळच्या सत्रामध्ये श्री सतीश खोमणे यांनी जुडो कराटे या विषयाचे प्रात्याक्षिक स्वत: केले व विदयार्थीनीकडून करुन घेतले. तसेच दुपारच्या सत्रामध्ये डॉ. रुचिका टाकळकर यांनी उपस्थित सर्व विदयार्थीनींना आपल्या आरोग्याची काळजी व निगा राखण्यासाठी वेगवेगळे अनुभव कथन करुन विदयार्थीनींच्या आरोग्याविषयक प्रश्नांना उत्तरे दिली.

सदर कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी महाविदयालयाचे प्राचार्य. मा.डॉ.एस.बी.पाटील,तसेच या कमिटीतील सर्व सहकारी प्राध्यापक,प्राध्यापिका,यांचे मार्गदर्शन व सहकार्य मिळाले.

डॉ.एस.बी.सुर्यवंशी
विद्यार्थी कल्याण अधिकारी
हु.रा.महाविद्यालय,राजगुरूनगर
ता.खेड,जि.पुणे.

HUTATMA RAJGURU MAHAVIDYALAYA
RAJGURU NAGAR

प्राचार्य.डॉ.एस.बी.पाटील
*Principal*
*Hutatma Rajguru Mahavidyalaya*
*(Arts, Science & Commerce)*
*Rajgurunagar.*